पंचायत समिती, शहापूर, जि. ठाणे. * जि.प. प्राथ. शाळा, शेरे.
जा.क्र. २२
दि. ९/७/१६

प्रति,

मा. अध्यक्ष,

अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान (मुंबई).

यांच्या सेवेशी सविनय सादर,

<u>संदर्भ</u> :- शैक्षणिक साहित्य पुरविल्याबाबतचे आभार पत्र,

महोदय,

आपण आमच्या जि.प.शाळा शेरे. शाळेस प्रत्यक्ष भेट देऊन आमच्या गरजू शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना आवश्यक ते शैक्षणिक साहित्य पुरविल्याने आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळाले.

याबद्दल आम्ही आपले खुप - खुप आभारी आहोत.

MKmarke
मुख्याध्यापक
जि. प. शाळा - शेरे,
ता. शहापूर, जि. ठाणे

प्रति
मानानीय अध्यक्ष 'अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान' मुंबई
मी सुवर्णा सुधाकर सोनावळे, कुमार तुषार सुधाकर सोनावळे इ. ३ री जि. प. शाळा शेई या विद्यार्थ्यांची पालक असून ह्या शाळेच्या व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा याद्वारे संस्थेच्या कार्याबद्दल आभार व्यक्त करत आहे, कि 2010 पासून 'अक्षरा सामाजिक' संस्था आमच्या दुर्गम भागामध्ये अतिशय मोलाचे कार्य करत आहे.

आमच्या या दुर्गम भागात 'अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान' तीन शाळांमध्ये कार्यरत आहे; अनुक्रमे जि. प. शाळा शेई, जि. प. शाळा सारवरवाडी, जि. प. शाळा गोंधळीपाडा. गेल्या पाचवर्षापासून 'अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान' हि संस्था वेगवेगळे उपक्रम राबवित आहे. आमच्या ह्या दुर्गम भागातील शाळांसाठी इंग्रजी व गणित विषयाचे विशेष व मोलाचे अध्यापन दिले जातात, तसेच सकस व पोषक आहार दिला जातो, शाळेचे गणवेश, दप्तर, शैक्षणिक साधणे पुरविणे, आरोग्य शिबीर आयोजित करणे, शैक्षणीक सहल या सारखे अनेक उपक्रम 'अक्षरा सामाजिक' संस्था करत आहे.

अशा या निरनिराळ्या उपक्रमातूनच आमच्या मुलांची प्रगती उंचावलेली दिसून येते. मुलांची शाळेतील उपस्थिती वाढली आहे, मुलांचे आरोग्य सुधारलेले दिसून येते, इंग्रजी विषयाची ओळख होवून मुलांमध्ये आवड निर्माण झाली. विशेषत: आमच्या ह्या भागातील मुले चांगल्या प्रकारे इंग्रजी लिहू व वाचू शकतात. तुमच्या ह्या उपक्रमांतर्गत मुलांना खुप फायदे मिळाल्याचे दिसून येते म्हणून मी पालक ह्या नात्याने तुमचे पुनश्च: आभार व्यक्त करते.

धन्यवाद

सुवर्णा. सु. सोनावळे
आपली कृपाभिलासू
सौ. सुवर्णा सुधाकर सोनावळे
रा. शेई, पो. शेरे, ता. शहापूर, जि. ठाणे
(वासिंद विभाग)

FOR EDUCATIONAL USE

ठाणे जिल्हा हरिजन सेवक संघ संचलित,

# शेई विभाग हायस्कूल, शेई

पो. शेरे, ता. शहापूर, व्हाया कल्याण, जि. ठाणे

School Index No. 16.05.025

THN / SHA / 209

मान्यता क्र. No. S/II/T/New Sch. 77 Nasik Dated 28/3/77

श्री. अशोक धर्माजी जाधव
अध्यक्ष

*****

श्री. जगन्नाथ हरी तारमळे
चेअरमन
मो. ८३७९८७९४०४

*****

श्री. लच्याणे शांतकुमार शंकर
बी.एस.स्सी.बी.एड.
(एम.एस.स्सी.) डी.एस.एम.
(मुख्याध्यापक)
मो. ७७१९८२२९९४

*****

जावक क्र. : शे.वि.हा.शे./१४६/२०१६-१७        दिनांक : १६/०७/२०१६

प्रति,

मा. संयोजक,

अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान मुंबई.

विषय :- विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप केल्या बाबत -----

महाशय

वरील उपरोक्त विषयान्वये आपल्या अक्षरा सामाजिक प्रतिष्ठानतर्फे सन- २०१६-१७ या शैक्षणीक वर्षात आमचे आदिवासी व ग्रामीण भागांतील गरजू विद्यार्थ्यांना ४५० वह्या मोफत वाटप केल्यात. इ. ५वी ते इ. ८वीच्या प्रत्येकी ३ या प्रमाणे १५० विद्यार्थ्यांना याचा लाभ होत आहे.

आपण जे सामाजिक कार्य घेउन गरजू विद्यार्थ्यांना साहित्य रुपाने सहकार्य करता त्याबद्दल हे विद्यालय आपले शतशः ऋणी आहे. यापुढेही असेच सहकार्य लाभो ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

मुख्याध्यापक
शेई विभाग हायस्कूल, शेई
ता. शहापुर, जि. ठाणे

ती,
ा. अध्यक्ष,
क्षरा सामाजिक प्रतिष्ठान, मुंबई.

<u>अर्जदार</u> – मुख्यशिक्षक, जि. प. शाळा गोंधळीपाडा,
केंद्र – शेरे, ता. शहापूर, जि. ठाणे.

<u>विषय</u> :– विदयार्थ्यांस शैक्षणिक साहित्य मिळाल्याबाबत
आभार पत्र,

महोदय,

आपण आमच्या जि. प. शाळा गोंधळीपाडा शाळेस प्रत्यक्ष भेट देवून आमच्या शाळेतील शिकणाऱ्या आदिवासी गरजू विदयार्थ्यांना आवश्यक ते शैक्षणिक साहित्य पुरविल्याने येथील विदयार्थ्यांना शाळेत येण्यास प्रोत्साहन मिळाले.

याबद्दल आम्ही आपले खुप - खुप आभारी आहोत.

NPatil.
मुख्यशिक्षक
जि. प. शाळा, गोंधळीपाडा शेरे,
केंद्र शेरे, ता. शहापूर जि. ठाणे.